शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २५५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शासकीय कंत्राटदार देविदान यांच्या घरावर जीएसटी विभागाची धाड



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील शासकीय कंत्राटदार देविदान यांच्या घरावर जीएसटी पथकाने धाड टाकली असल्याचे वृत हाती येत आहे. मागील तीन दिवसापासून जीएसटी चे पथक ठान मांडून बसले असून अत्यंत गोपनिय पध्दतीने कारवाई होत असल्याची प्राथमिक माहिती आहे. या तपासात नेमकं काय निष्पन्न झाले याची माहिती अद्याप नसली तरी अचानक जीएसटी चे पथक जालन्यात धडकल्याने आणि ते ही शहरातील शासकीय कंत्राटदारा च्या निवास स्थानी धाड टाकल्याने शहरात एकच खळबळ उडाली.

या धाडीमध्ये अद्यापपर्यंत काय निष्पन्न झाले याची माहिती अत्यंत गोपनीय ठेवण्यात येत असून अजून तरी अधिकृतरित्या कोणतीही माहिती माध्यमाला देण्यात आलेली नसली तरी या कारवाईने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

# अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के भारतीयांचा व्हिसा रद्द

## सरकार दखल घेणार का? काँग्रेसचा प्रश्न

**नवी दिल्ली -** अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने ज्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले आहेत किंवा स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टममधून नोंदणी रद्द केली आहे, त्यापैकी सुमारे ५० टक्के विद्यार्थी भारतातील आहेत.

अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने विद्यार्थी, वकील आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून या प्रकरणांवर ३२७ अहवाल गोळा केले आहेत. यातून ही माहिती समोर आली आहे. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १४ टक्के विद्यार्थी चीनचे आहेत. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या इतरांमध्ये दक्षिण कोरिया, नेपाळ आणि बांगलादेशच्या विद्यांर्थ्यांचाही समावेश आहे.

ओपन डोअर्सच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ मध्ये अमेरिकेत परदेशातील सर्वाधिक विद्यार्थी भारतातील आहेत. २०२३-२४ मध्ये ११,२६,६९० आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी ३,३१,६०२ विद्यार्थी भारतातील होते (एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी २९%). त्यानंतर २.७७ लाख चिनी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनच्या अहवालात असेही म्हटले आहे की, ज्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत, त्यापैकी ५० टक्के विद्यार्थी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंगवर होते. म्हणजेच ते पदवीधर झाले असून, अमेरिकेत नोकरी करत आहेत.

ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग एफ १ व्हिसावर अमेरिकेत असलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना १२ महिन्यांपर्यंत काम करण्याची परवानगी मिळते. यानंतर जे विद्यांर्थ्यी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात काम करतात त्यांना व्हिसामध्ये आणखी २४ महिन्यांनी मुदतवाढ मिळते.

असोसिएटेड प्रेसच्या वृत्तानुसार, मार्चअखेरपासून १६० विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील किमान १,०२४ विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत किंवा त्यांचा कायदेशीर दर्जा रद्द करण्यात आला आहे. यामुळे या विद्यार्थ्यांना अटकेचा आणि त्यांना हद्दपार करण्याचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान अमेरिकेने विद्यार्थी व्हिसा रद्द केलेल्यांमध्ये ५० टक्के भारतीय विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे समोर आल्यानंतर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केंद्र सरकारला सवाल केला आहे.

जयराम रमेश यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने काल जारी केलेले पत्रक भारतासाठी चिंतेचा विषय आहे. त्यांनी आतापर्यंत गोळा केलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या व्हिसा रद्द करण्याच्या ३२७ प्रकरणांपैकी ५०% विद्यार्थी भारतीय आहेत. व्हिसा रद्द करण्याची कारणे अस्पष्ट आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि धास्ती सतत वाढत आहे. परराष्ट्र डॉ.एस.जयशंकर तुम्ही या प्रकरणाची दखल घेणार आहात का?

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संगणक कोडींगची ओळख करून द्यावी - प्राचार्य डॉ राजेंद्र कांबळे

## मेझॉन फ्युचर इंजीनियर व एलएफइ मार्फत लॅपटॉप व टॅबचे बक्षीस वितरण



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये २१व्या शतकातील कौशल्यांवर भर देण्यात आला आहे त्या अनुषंगाने विविध संस्था यासाठी काम करीत आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संगणक कोडींगची माहिती करून द्यावी जेणेकरून भविष्यवेधी तंत्रज्ञान प्राप्त करून घेतील असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्र कांबळे यांनी बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी बोलताना केले.

जालना जिल्ह्यातील शिक्षकांसाठी मेझॉन फ्युचर इंजीनियर व एल एफ ई संस्थेने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेसोबत जालन्यातील शिक्षकांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

जालना जिल्ह्यातील शिक्षकांसाठी मेझॉन फ्युचर एज्युकेशन संस्थेमार्फत ऑनलाइन कोडींग चा कोर्स घेण्यात आला होता. या कोर्ससाठी ६०८ शिक्षकांनी नोंदणी केली होती पैकी ९४ शिक्षकांनी संपूर्ण कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या कोर्स मधील टॉप २० शिक्षकांची निवड करून प्रथम तीन क्रमांकाच्या शिक्षकांना लॅपटॉप,टॅब व अलेक्सा व प्रशस्तीपत्र बक्षीस स्वरूपात देऊन सन्मानित करण्यात आले. चार ते दहा क्रमांकाच्या शिक्षकांना लॅपटॉप व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तर ११ ते २० क्रमांकाच्या शिक्षकांना दोन टॅब व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉक्टर आर डी कांबळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रमोद कुमावत, श्री संजय येवती, अधिव्याख्याता योगेश्वर जाधव भारत सूर्यवंशी निलोफर पटेल डॉ. श्रीहरी दराडे गटशिक्षणाधिकारी रवी जोशी, डॉक्टर भरत वानखेडे मेझॉन फ्युचर इंजीनियर व एलएफइचे समन्वयक रविराज निंबाळकर उपस्थित होते.

यावेळी डॉक्टर प्रमोद कुमावत श्रीमती निलोफर पटेल श्री संजय येवते यांनी मनोगत व्यक्त **पान २ वर**

# विद्यार्थी मित्रांनो शिक्षणातून समाजात परिवर्तन घडवा -बाबासाहेब गोंटे

**अंबड । प्रतिनिधी -** विद्यार्थी मित्रांनो जीवनात सकारात्मकता अंगी बाळगून यशस्वी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी अभ्यासात सातत्य टिकवून ठेवत ज्ञानाच्या कक्षा रुंदावायाला हव्यात. पुस्तकांशी मैत्री केल्यास ज्ञानाची समृध्दी वाढीस लागते. असे आवाहन अंबड मत्स्योदरीचे शिक्षक बाबासाहेब गोंटे यांनी अंबड तालुक्यातील झिरपी येथील जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळेत गुरूवारी (ता.१७) इयत्ता सातवी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बाबासाहेब गोंटे यांनी बोलताना केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आश्रुबा गवई तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच संदिप भवर, पोलिस हेड कॉन्स्टेबल रामेश्वर मुळक, केंद्रप्रमुख सुंदर राऊत यांची प्रमूख उपस्थिती होती. पुढें बोलताना बाबासाहेब गोंटे म्हणाले की,शिक्षण हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे. शिक्षणातून आचार, विचार,संस्कार शिस्त मिळते. आपले उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी शिक्षणातून क्रांती घडवीत समजात परिवर्तन घडवायला हवेत.



शिक्षणातून व्यक्ती समाजात उत्तम नागरीक बनतो. अनेक महान विचारवंत यांनी शिक्षणातून खऱ्या अर्थाने समाजात परिवर्तन घडविले आहे.यामुळे विद्यार्थ्यांनी जाधव, उगले, जाधवसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन उपक्रमशील शिक्षक शिवाजी धूपे यांनी तर आभाप्रदर्शन सरपंच संदिप भवर यांनी मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यासाठी स्नेहभोजन ठेवण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाला अब्दुला बाशन, शिवाजी धुपे, सचिन दोरखे, यादवकुमार ठोके, श्रीनिवास ढाकणे,दत्ता भवर, उज्ज्वला धपाटे, शालिनी वानखेडे, परमेश्वर मैंद, शिवाजी

# वाढत्या शिक्षक आत्महत्या ; शासन प्रशासन आणि संस्थाचालक जबाबदार – चंद्रकांत चव्हाण

**जालना । प्रतिनिधी -** आपल्या संस्कृतीमध्ये गुरु या शब्दाला आणि व्यक्तीला फारच महत्वाचे स्थान आहे .माणसाला माणूस म्हणून तयार करण्यामध्ये शिक्षकाची महत्वाची भूमिका आहे . शिक्षक समाजशील माणूस तयार करण्याचे कार्य करत असतो. school is mirror of the society. समाज बदलत गेला तसा गुरु सुद्धा कालानुरूप बदलत आहे

शिक्षक कभी सामान्य नही होता निर्माण और प्रलय उसके गोद मे पलते है असे आर्य चाणक्य म्हणतात. या गुरुना अनादी काळापासून राज सत्ता हेटाळणीचा सामना करावा लागला आहे आज सुद्धा हे सत्यच आहे . इसवी सन २००० साली शासनाने कायम विना अनुदानित धोरण लागू केले आणि शिक्षण क्षेत्राचे वाटोळे व्हायला सुरुवात झाली. राज्यातील गोरगरीब शेतकरी शेतमजुर भूमिहीन बहुजनांचे लेकरे गुरुजी होता यावे म्हणून या कायम विना अनुदानित शिक्षण शाळेत लाखो रुपये डोनेशन देऊन शिक्षक झाले आणि खर्या अर्थाने मृत्यूच्या सापल्यात अडकले २००० साली कायम शाळा सुरू झाल्या आणि प्रचंड संघर्षानंतर २०१८ साली २०% पगार काही कर्मच्याऱ्यांच्या खात्यावर जमा व्हायला सुरुवात झाली आज २०२५ या सालात सुद्धा त्या शाळा १००% वेतन अनुदानावर आल्या नाहीत हीच खरी शोकांतिका आहे . या टप्प्याचं राजकारणात आणि आपल्यात कर्मचारी अडकला आणि त्यांची अवस्था चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यू सारखीच झाली . सरकार कोणाचे ही असो शिक्षक टप्पा ठप्पच राहिला .

या सर्वात भर म्हणून प्रशासन कायम त्यांच्या अडचणी वाढवते प्रशासन नोटाशिवाय चालतच नाही त्यामुळे शिक्षक आणखीन त्रस्त झाले माहिती मागविण्याच्या नावाखाली कागद गोळा करण्याचा प्रशासनाला छंदच झाला आहे.आजतगायतपर्यंत एकच माहिती पुन्हा पुन्हा मागण्याचा जागतिक विक्रम आपल्या राज्यात आहे पुन्हा मूल्यांकन पुनर्मुल्यांकन या गोंडस नावाखाली माहिती मागवण्याचा आणि नोटाचा भडीमार करायचा पण पुढचा टप्पा काही नाही द्यायचा.

अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसाराचा गाडा कसा ओढतात यावर महाभारतासारखा एक ग्रंथ तयार होऊ शकतो .शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान कार्य झाल्यानंतर हे कर्मचारी तुम्हाला वेगवेगळ्या भूमिकेत दिसतील . वेटर, दुकानात, सिमेंट उचलणारा,चहाची टपरीवर कपबशी विसलतांना तरी या



शासनाला आणि समाजाला जाग येत नाही संपूर्ण जगाच्या इतिहासात आणि वर्तमानात महाराष्ट्र सोडून २० २० वर्ष कामाचे दाम न घेता गप्पगुमान काम करणारे अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मला दाखवून द्या .भारतात नोकरी देण्याचे काम राष्ट्रपती सुद्धा करू शकत नाहीत पण कायद्याने संस्थाचालकांना नोकरी देण्याचा अधिकार मिळाला आणि इथेच खरा घोटाळा झाला . हा अधिकार देताना डोळ्यासमोर भाऊराव पाटलांचा आदर्श होता पण आता संस्थाचालक कोण आहेत राजकारणी नाक्यावर नेत्यांच्या मागेपुढे लाळ घोटणारे शिक्षण क्षेत्रात काम करणारे अधिकारी हे आहेत . काही संस्था आणि संस्थाचालक अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्य करतात हे सुद्धा मान्य करायलाच पाहिजे. परंतु २० २० लाख डोनेशन घेणारे,कर्मचाऱ्यांना घरी , शेतावर , गाडीवर ड्राइवर, स्वतः चा झ, इंग्लिश शाळेवर HM² Manager,अश्या संस्थाचालकाची संख्या जास्त आहे . एक संस्थाचालक महाशयांनी तर शासकीय अनुदानावर गायी घेतल्या शाळेवर गायी सांभाळतात गाईची सर्व सेवा म्हणजे शेण काढण्यापासून ते दूध साहेबांच्या घरी नेवून देण्यापर्यंतचे कामासाठी सकाळी एक आणि रात्री एका शिक्षकाची नेमणूक केली आहे.आणि विशेष म्हणजे गाय पालनाचे पुण्य मात्र साहेबांनाच मिळते बर. हे संस्थाचालक महाभाग या शिक्षकांचा वापर फक्त संडासात असणाऱ्या टमरेलसारखाच करतात शिक्षकांच्या पगारी तुंबवायच्या आणि त्या काढण्यासाठी मोठी रक्कम मागायची प्रशासनाला थोडीशी मलाई मिळते म्हणून ते ही खुश म्हणजे प्रशासकीय अधिकारी १० रुपये मागितले तर हे कर्मचाऱ्यांकडून १००० लुटतात. शाळेवर नोकरी करणाऱ्यामध्ये यांच्या घरातले अर्धे लोक असतात . भाऊ बहीण भावाची बायको बहिणीचा नवरा साली साला पुतण्या भाचा आणि महत्वाचे म्हणजे हे कधीच शाळेवर फिरकत नाहीत आणि आले तरी राजेशाही थाटातच. दर महिन्याला इमारत भाडे नावाखाली प्रत्येक कर्मचाऱ्यांना दर महिन्याला सरासरी एक हजार द्यावेच लागतात.पुन्हा आता नवा ट्रेंड सुरू आहे school bus त्यासाठी पुन्हा पैसा. online कामासाठी लागणारे सर्व खर्च शिक्षकांनीच करावेत असा दंडक आहे . पुन्हा संस्थाचालक किंवा नातेवाईकांच्या वाढदिवस असल्यास हमखास सोनेच द्यावे लागते असा सारा विचार केल्यास कर्मचाऱ्यांना एका वर्षात ९ महिनाचाच वेतन मिळते संस्थाचालकच्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर बिनबुडाचे आणि तथ्यहीन आरोप लावले जातात मग निलंबन चौकशी समिती नेमली जाते. चौकशी समिती हा एक संशोधनाचा विषय आहे. छत्रपती संभाजीनगर या एका जिल्ह्यात चौकशी समिती मधे एकच व्यक्ती आदर्श म्हणून सापडतो तो सुद्धा १५ वर्षापूर्वी सेवा निवृत्त झालेला आहे तो चालतो कारण नियमात वयाचा उल्लेख नाही बर आदर्श शिक्षक तोच,तोच आदर्श मुख्याध्यापक आणि चौकशी समितीचा निर्णय पण **पान २ वर**

# संपादकीय

## उत्क्रांतीवादाचा जनक

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# भाषा ही संस्कृतीची आस्था असल्याने तीचा धर्माशी काहीही संबंध नाही

भारतातील प्रत्येक भाषा संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आहेत; ज्याप्रमाणे गंगा,यमुना,कावेरी,गोदावरी, तापी, कृष्णा, नर्मदा इत्यादी अनेक नद्यांच्या सोज्वळ आणि निर्मळते मधुनच भारतीय भाषेचा उगम झाला आहे. त्यामुळे त्याला धर्माशी जोडता येणार नाही.आपण जगात कुठेही जा परंतु भारतीय संस्कृती,भाषा,वेगवेगळे रहाणीमान, खानपान, व्यंजनाचे वेगवेगळे प्रकार या संपूर्ण परंपरा हजारो वर्षांपासून भारतातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहे आणि तीच परंपरा आताही सुरूच आहे.भाषा ही विचारांच्या देवाणघेवाणीचे एक मोठे माध्यम आहे.तिच्या माध्यमातून विविध आचार-विचार आणि श्रध्दा असलेले लोक जोडले जातात.ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनू नये,अशी अपेक्षा व्यक्त करत नगरपरिषदेच्या क्षेत्रात राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेशी परिचित असेल तर किमान नगर परिषदेच्या फलकावर अधिकृत भाषेव्यतिरिक्त म्हणजेच मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरल्यास कोणताही आक्षेप नसावा असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.भारतात अनेक धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे भाषा आणि धर्म याचा कुठेही संबंध जुळुच शकत नाही.कारण भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत त्या-त्या अनुषंगाने भाषेचे सुध्दा वर्णन होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्रांतील मराठी, गुजरात मधील गुजराती, तामिळनाडू मधील तामिळ अशा प्रकारे प्रत्येक राज्यात भाषेचे आगळेवेगळे रूप दिसुन येते व त्याची गणना समाजामध्ये होते.त्याचप्रमाणे उर्दू भाषेचा जन्म सुद्धा भारतातील आहे तिचा धर्माशी काहीही संबंध नाही.इंग्रजी भाषा ही इंग्रजांनी भारतावर लादलेली भाषा आहे.त्यामुळे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील संपूर्ण भाषांची नाळ भारतभूमीतच गाडली आहे. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेतील फलकावर उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली उर्दू भाषा हा धर्म नाही.ही लोकांमध्ये फूट पाडण्याचे कारण बनू नये.उर्दू हे गंगा-यमुना संस्कृती (गंगा-जमुनी तहजीब) किंवा हिंदुस्थानी संस्कृतीचे उत्तर उदाहरण आहे, असे हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.भाषा म्हणजे कोणताही धर्म नाही ती धर्माचे प्रतिनिधित्वही करीत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भाषा म्हणजे एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे. उत्तर आणि मध्य भारतातील मैदानी भागांचे मिश्र सांस्कृतिक स्वरूप असलेल्या गंगा-यमुना संस्कृती किंवा हिंदुस्थानी तहजीबचे उत्तम उदाहरण असलेल्या उर्दूच्या बाबतीतही हेच आहे.सर्वोच्च न्यायालय म्हणतो की, उर्दू ही भारतासाठी परकी आहे, या गैरसमजातून उर्दूविषयीचा पूर्वग्रह निर्माण झाला आहे.उर्दू हीदेखील मराठी आणि हिंदीप्रमाणेच इंडो-आर्यन भाषा आहे व या भूमीत जन्माला आलेली ही भाषा आहे अशा स्पष्ट शब्दात सांगितले.भाषेचा विरोधच करायचा असेल तर इंग्रजी भाषेचा करावा आणि करायला पाहिजे. कारण देशातील इतर भाषांना इंग्रजी भाषा पोखरत असुन देशात घर करण्याचा प्रयत्न करीत आहे याकडे भारतीयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज भारतातील प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.याहीपलीकडे आपण गेलो तर प्रत्येक राज्याच्या ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला तेथील भाषा,रहनसहन आणि संस्कृती यांचेही आगळेवेगळे दर्शन होते.म्हणजे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील प्रत्येक भाषा हिंदुस्थानच्या रक्तात आणि नसानसामध्ये दिसून येते.त्यामुळे उर्दू भाषा भारतीयांसाठी नवीन नसुन ती आपलीच आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील



प्रत्येक भाषा ही दैवी देण असुन ती सर्वांनीच स्विकारली पाहिजे.कारण हिंदू,बौद्ध,शिख, ईसाई, मुस्लिम या संपूर्ण धर्मांच्या साधुसंतांनी, महाज्ञानी, तपस्वी यांच्या परिश्रमातूनच भारतातील प्रत्येक भाषेचा उगम झाला आहे व ते सर्वांचेच श्रध्दा स्थान आहे.त्यामुळे भारतातील कोणतीही भाषा धर्माशी जोडली जावू शकत नाही.भाषा ही ईश्वरी देण आहे तीचा आदर व्हायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्यातील भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा यामुळे प्रत्येक राज्यातील मातृभाषा सुरक्षित राहील.कारण मातृभाषा ही कोणाही कडून शिकविली जात नाही ती जन्म ताच अवगत होत असते म्हणूनच तिला मातृभाषा म्हटल्या जाते.त्यामुळे देशातील संपूर्ण भाषा, मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषेचा आदर सर्वांनीच केला पाहिजे.यामुळे देशातील संपूर्ण भाषा व बोली सुरक्षित राहील.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वयाच्या १८ व्या वर्षी मातृभूमीसाठी आपल्या प्राणांचे बलीदान करणारे अनंत कान्हेरे !

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे शिक्षण घेत असतांना क्रांतीकार्याची शपथ घेणार्या अनंतरावांनी देशभक्तांचा छळ करणारा नाशिकचा क्रूर इंग्रज जिल्हाधिकारी जॅक्सन याला संगीत शारदा या नाटकाच्या प्रयोगाला आलेला असतांना गोळ्या घातल्या. या प्रकरणी त्यांना ठाणे कारागृहात फाशी दिली गेली. वयाच्या १८ व्या वर्षी देशासाठी हुतात्मा अनंत कान्हेरे यांनी आपल्या प्राणांचे बलीदान दिले.

जन्म - कोकणातील एक युवक माध्यमिक शिक्षणासाठी संभाजीनगरला (औरंगाबादला) जातो काय, तेथे क्रांतीकार्यात भाग घेतो काय, त्याच्या हातात स्वा. सावरकरांनी लंडनहून पाठवलेले पिस्तुल पडते काय आणि तो एका कपटी आणि उच्चपदस्थ इंग्रजाचा वध करतो काय, सारेच अतर्क्य आणि अशक्य ! पण हे अशक्य कृत्य शक्य करून दाखवणार्या युवकाचे नाव होते, अनंत लक्ष्मण कान्हेरे !

अनंतरावांचा जन्म १८९१ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील आयनी-मेटे या गावी झाला. इंग्रजी शिक्षणासाठी ते त्यांच्या मामाकडे औरंगाबादला गेले. काही वर्षांनी ते गंगाराम मारवाडी यांच्याकडे भाड्याची खोली घेऊन राहू लागले. नाशिकच्या स्वातंत्र्यवादी गुप्त संस्थेच्या काशीनाथ टोणपे यांनी गंगाराम आणि अनंतराव यांना गुप्त संस्थेची शपथ दिली. मदनलाल धिंग्रांनी कर्झन वायलीच्या घेतलेल्या प्रतिशोधानंतर अनंतरावही अशा कृतीला अधीर झाले. मग गंगाराम यांनी एकदा अनंतरावांच्या हातावर तापलेला लोखंडी चिमटा ठेवून आणि एकदा पेटलेल्या चिमणीची तापलेली काच दोन्ही हातांनी धरायला सांगून त्यांची परीक्षा घेतली. दोन्हीही दिव्ये करूनही अनंतरावांची मुद्रा निर्विकार होती !

जॅक्सनला ठार मारण्याचा कट रचणे - याच सुमारास नाशिकच्या जिल्हाधिकारीपदी जॅक्सन नावाचा क्रूर आणि ढोंगी अधिकारी होता. त्याने खरे वकील, कीर्तनकार तांबेशास्त्री, बाबाराव सावरकर आदी देशभक्तांना कारावासात धाडले होते.




अशा अनेक कुकर्मांनीच जॅक्सनने आपला मृत्यूलेख लिहिला. या कामी नियतीनेच अनंतरावांची निवड केली. जॅक्सनला ठार मारण्यासाठी अनंतरावांनी पिस्तुलाच्या नेमबाजीचा सराव केला. जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन त्यांनी जॅक्सनला नीट पाहून घेतले. 'जॅक्सनला मारल्यावर फाशी जावे लागेल, तेव्हा निदान आई-वडिलांकडे आठवणीसाठी आपले एखादे छायाचित्र असावे'; म्हणून त्यांनी स्वतःचे एक छायाचित्रही काढून घेतले.

जॅक्सनवर चार गोळ्या झाडल्या ! - २१ डिसेंबर १९०९ या दिवशी जॅक्सनच्या सन्मानार्थ नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात किर्लोस्कर नाटक मंडळींचा 'शारदा' नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला होता. जॅक्सन दरवाजातून नाट्यगृहात प्रवेश करत असतांनाच आधीच येऊन बसलेल्या अनंतरावांनी जॅक्सनवर गोळी झाडली. ती त्याच्या काखेतून निघून गेली. चपळाई करून अनंतरावांनी जॅक्सनवर समोरून चार गोळ्या झाडल्या. जॅक्सन जागीच कोसळला. अनंतराव शांतपणे आरक्षकांच्या स्वाधीन झाले.

फाशीची शिक्षा - जॅक्सन वधाच्या आरोपाखाली अनंतराव आणि त्यांचे सहकारी अण्णा कर्वे अन् विनायक देशपांडे यांना फाशीची शिक्षा झाली. १९ एप्रिल १९१० या दिवशी ठाण्याच्या तुरुंगात सकाळी ७ वाजता हे तीन क्रांतीकारक धीरोदात्त वृत्तीने फाशी गेले. त्यांच्या नातलगांच्या विनंतीला न जुमानता ब्रिटीश सरकारने ठाण्याच्या खाडीकिनारी या तिघांच्याही मृतदेहांना अग्नी दिला आणि त्यांची राखही कोणाला मिळू नये, म्हणून ती राख खाडीच्या पाण्यात फेकून दिली.

वयाच्या १८ व्या वर्षी देशासाठी आपल्या प्राणांचे बलीदान करणार्या हुतात्मा अनंत कान्हेरे यांच्यासारख्या अनेकांच्या बलीदानांमुळेच आज आपण स्वतंत्र आहोत. देशप्रेमापोटी क्रांतीकारक प्रसंगी फासावर चढले; आपण किमान स्वदेशी वस्तू तरी वापरुया आणि राष्ट्रजागृती करुया. क्रांतिकारक अनंत कान्हेरे यांना विनम्र अभिवादन !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

## पँथर्स रिपब्लिकन पार्टीतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**जालना-** पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

मस्तगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे मराठवाडा सरचिटणीस सुभाष गाडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी एम.के.ठोंबरे,सर्जेराव वाहुळकर,कांतीलाल वाहुळकर, गोवर्धन वाहुळकर, अनिल वाघमारे, कारभारी बोर्डे, ड. योगेश गाडगे, बाबासाहेब बोर्डे, मोकींदा खंडागळे,अनिल वाहुळकर यांसह पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ...

केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल बारहाते यांनी केले तर प्रास्ताविक मयूर कटारे यांनी केले. उपस्थित आमचे आभार रविराज निंबाळकर यांनी मानले.

## वाढत्या शिक्षक ...

अगोदरच ठरलेला असतो मग कोर्ट प्रकरण सुरू होते. म्हणजेच संस्थाचालकाचे म्हणणे नाही ऐकले तर चौकशी समीती लागलीच समजा.जे चौकशी समिती सदस्य असतात ते देवून घेवून चौकशी करतात म्हणजे आमचे ऐकले नाही तर लावतो चौकशी.म्हणजेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा कानपट्टी वर बंदूकच आहे कायम

महात्मा फुले यांनी शेतकरी कसा नागवला जातो हे त्यांच्या लिखाणातून स्पष्ट केले अगदी तसेच साहित्य शिक्षण क्षेत्रात निर्माण होईल असे वाटते .शिक्षक हा अत्यंत भित्रा मध्यमवर्गीय प्राणी आहे . नोकरी लागली की तो एक कोश तयार करतो. आणि घाबरत घाबरत कधी शासनाला कधी कधी प्रशासनाला आणि कायमपणे संस्थाचालकाला घाबरत असतो

शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासन प्रशासन आणि संस्थाचालक पोटावरच मारतात त्यांची अडचण अशी आहे की त्यांचे प्रतिनिधी ज्यांना त्यांनी निवडून दिलेले आहे ते काहीच न करता चुप्पी साधत असतात.येत्या कालावधीत शिक्षकाच्या अनुदान आणि पेंशन आणि संस्थाचालक यांच्याकडून होणारा आर्थिक व मानसिक त्रास यामुळे आत्म हत्या वाढणार आहेत. बुद्धीजीवीची आत्महत्या शासनाला परवडणार नाही याकडे शासनाने जाणीवपूर्वक लक्ष द्यावे आणि उपाययोजना कराव्यात ही नम्र अपेक्षा

उपाययोजना १. गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेला अनुदान खेळ संपवून १००%अनुदान द्यावे.

२. पेन्शन चे टेन्शन कमी करावे , ३. चौकशी समितीच्या कलमात संशोधन करून निर्णय घ्यावा

## महत्त्व अभ्यासाचे

असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे अशक्यप्राय गोष्टी सुद्धा अभ्यासाने सहज साध्य होतात, हेच संत तुकाराम महाराजांनी सर्वांना सांगितले. आपल्याला आपल्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सतत अभ्यासाची गरज असते. कारण जग फार वेगात बदलत आहे. बदलत्या जगा नुसार आपण बदल नाही स्वीकारला तर निश्चितच आपण मागे राहू.

विद्यार्थी दशेत असताना विविध पद्धतीने अभ्यास केला तर तो मनोरंजनात्मक व आनंददायी होतो. नुसता होमवर्क, पाठांतर, वाचन नकोच. त्याऐवजी स्वतः प्रश्न तयार करणे, नोट्स काढणे, पीपीटी बनविणे, वादविवाद, प्रश्नमंजुषा, चर्चासत्र, गप्पाष्टक, संभाषण, मुलाखत, प्रत्यक्ष कृती करून, खेळ, प्रकल्प बनविणे, उजळणी यामुळे अधिक सखोल अभ्यास होतो. खरं तर विद्यार्थ्यांसमोर अभ्यास कसा करावा हा खूप मोठा प्रश्न असतो. अभ्यास करण्यामध्ये आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आपला मेंदू. अभ्यास चांगला होण्यासाठी व लक्षात राहण्यासाठी अभ्यास केल्यानंतर मेंदूला विश्रांती मिळणे आवश्यक असते. त्यामुळे शक्यतो वैयक्तिक अभ्यास करताना रात्री झोपण्यापूर्वी अभ्यास करावा म्हणजेच रात्री झोपताना मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप यासारख्या तत्सम वस्तूंपासून लांब राहावे. अभ्यास केल्यानंतर आपण झोपतो म्हणजे आपल्या मेंदूला विश्रांती देतो. त्यामुळे जो काही अभ्यास केलेला आहे तो लक्षात राहतो. सकाळी उठल्यावर आपण रात्री काय अभ्यास केला ते आठवून लिहून बघितलं तर नक्कीच लक्षात येतं की आपल्याला चांगल्यापैकी लक्षात राहत आहे. याशिवाय दिवसभरात ज्यावेळी माणसाचे मन फ्रेश असते आनंदी असते अशा वेळेस अवघड किंवा कठीण विषयांचा अभ्यास करावा आणि जेव्हा कंटाळा किंवा बदल हवा असतो तेव्हा आपल्या आवडत्या किंवा सोप्या विषयांचा अभ्यास करावा.

अभ्यास लक्षात राहण्यासाठी आपण वेगवेगळ्या ट्रिक्स, फंडे वापरू शकतो. म्हणजे अनेक मुद्दे एका शब्दात गुंफता येऊ शकतात. उदाहरणार्थ 'तानापिहिनिपाजा' या एका शब्दात इंद्रधनुष्याचे सात रंग दिसतात तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा. पूर्वीपासून आपल्याकडे उद्या जो भाग शिकवणार आहेत त्याचे आधी वाचन करणे अपेक्षित होते. त्यामुळे अध्ययन करतानाच लक्षात राहणे सुलभ आणि सोपे होऊन जाते

एकाच वेळी सर्व अभ्यास न करता रोज थोडा थोडा अभ्यास करत राहणे, केलेल्या अभ्यासाची उजळणी करणे, सुट्टीच्या दिवशी झालेल्या घटकांची उजळणी करणे यामुळे सुद्धा चांगला अभ्यास होतो. बऱ्याच वेळेला अशी एखादी गोष्ट आपल्याला करावी लागते की जी आपल्याला जमत नसते किंवा आपल्याला करायला आवडत नसते. अशावेळी ती गोष्ट किमान गरजेपुरती किंवा आपलं नुकसान होणार नाही इतपत शिकून घ्यावी. अभ्यास करताना इतरांकडे असलेल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा उपयोग समजून घेणे हे फार महत्त्वाचे असते. म्हणजेच जगात सध्या काय चालू आहे याची सखोल माहिती घेणे नाहीतर मग आपण आपल्याच विश्वात रममाण राहतो. इतिहासात भारतावर आक्रमण करणारे आक्रमक हे आपल्यापेक्षा अधिक प्रगत असल्याचे आपल्याला दिसून येते. आपण त्यांच्याकडे आपल्यापेक्षा वेगळं काय आहे व त्यावर कशी मात करता येईल याचा विचार फारसा केलेला दिसून येत नाही. परिणामी अनेक युद्धांमध्ये परकीय आक्रमकां समोर आपला पराभव झालेला दिसून येतो. त्यामुळेच आपल्याला शेकडो वर्षापासून ची गुलामी स्वीकारावी लागली. हे कदापि विसरता कामा नये.

प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, डोंबिवली.
prashantshirude1674gmail.com,
९९६७८१७८७६.

### वाचकांचे मनोगत

## धरणातील पाणी साठा वाढण्यासाठी गाळ काढणे आवश्यक

वर्षानुवर्षे पाणी टंचाईचा सामना नागरिकांना करावा लागतो.जानेवारीपासून पाणी जपून वापराच्या सुचना संबंधित ग्रामपंचायत पासून महानगरपालिका स्तरावरील शासनाकडून अधिकृत परिपत्रके काढली जातात. मुंबई महानगरपालिका सहा धरणातील शिल्लक पाणीसाठा विचारात घेऊन दहा - पंधरा टक्के दररोज पाणी कपात करते.जूनच्या पहिल्या आठवड्यात साधारण सात जून रोजी पाऊस सुरु होतो.मृग नक्षत्रात पावसाळा सुरू झाला तर पुढचा धोका टळतो.मुंबईतील लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे.सुमारे एक कोटी चाळीस लाख संख्या असलेल्या शहरात दररोज साडेचार लाख दशलक्ष लिटर पाणी लागते.प्रती दिन प्रती व्यक्ति किमान पंचेचाळीस लिटर पाणी देणे अपेक्षित आहे.परंतु,पाणी गळती आणि पाण्याची चोरी याचा फटका बसतो.मुंबईतील दररोज नवनवीन इमारत बांधकामे ,घरच्या दुरुस्त्या,रस्ते बांधकाम, वाहतूक बेटांचे शुशोभिकरण इत्यादी बांधकामांकरिता पाणी लागते .गाड्या साफसफाईसाठी पाण्याचा वापर होतो.हे अधिकचे लागणारे पाणी आणणार कोठून ? महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागरिकांना दररोज पाणी टंचाईला सामोरे जावे लागते.काही गावांत आठवड्यातून दोनदा पाणी येते काय करणार पाण्याविना .गुरू वासरे,सडासारवण, कपडे धुणे,घरातील कामे पाण्याशिवाय कशी करणार. कोकणातील अनेक गावांत अर्धा तास पाणी पुरवठा केला जातो. कधी यंत्रणेत बिघाड झाला की अनिश्चित काळ पाण्याविना दिवस काढावे लागतात. १९५२ सालापासून लोकप्रतिनिधी सार्वत्रिक निवडणुकीतून निवडणूक सत्तेवर आले. आमदार, खासदार यांनी कोकणातील पाणी समस्येवर पाणी परिषद घेऊन पाणी पुरवठा करणार्या शासकीय यंत्रणेतील अधिकार्यांसमोर पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले असते तर पाणी टंचाईची वेळ आली नसती. नियोजनाचा अभाव हेच मुख्य कारण आहे. कोकणातील जनता कधी मोर्चे, आंदोलने करून अधिकार्यांना ,आमदार, खासदार यांना वेठीस धरत नाही.कोकणातील सर्व तालुक्यातील नद्यां गाळाने भरलेल्या आहेत त्यातील गाळ काढून पाण्याचे झरे मोकळे करणे आवश्यक आहे.तेव्हाच पाणी साठा उपलब्ध होईल, अशीच अवस्था वाहाळांची आहे.वाहाळांवर बंधारे बांधून पाणी साठा जतन करण्याचे शासनानेच धोरण आहे तरीही वादळांची साफसफाई करून झरे मोकळे करणे आवश्यक आहे.बांधलेल्या धरणातील पाणी साठा वाढण्यासाठी गाळ काढणे आवश्यक आहे.तेव्हाच पाण्याच्या साठ्यात वाढ होईल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

# महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातेमा शेख यांना भारतरत्न द्यावा!

## मॉ सेवाभावी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातेमा शेख यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा, अशी मागणी मॉ सेवाभावी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांनी केली आहे.



याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रात म्हटले की, महात्मा ज्योतीबा फुले यांनी समाजातील सर्व गोरगरीब घटकांसाठी मागासवर्गीय भटके, विमुक्त जाती यांच्यासाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला. व म ानवता जपण्याचे कार्य केले. तसेच पिण्याच्या पाण्याचा विहिर सर्वांसाठी खुली केली. मुलींची शाळा काढली. व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षक बनविले. व फातेमा शेख या पहिल्या मुस्लीम शिक्षीका त्यांच्यासम वेत होत्या. यामुळे महात्मा ज्योतीबा फुले , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातेमा शेख यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे, सचिव सुरेश मानकस, उपाध्यक्ष सुरेश रत्नपारखे, सहसचिव ॲड. राम `श्वर खांडेभराड, वैजीनाथ नागरे, नकुल पराये, मंगेश घुगे, दत्ता खांडेभराड यांनी केली आहे.

याबबतचे निवेदन राष्ट्रपती द्रोपती मुरमू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अतुल सावे, पालकमंत्री पंकजाताई मुंडे , सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांना पाठविले आहे.

# शिवसेनेच्या अंबड तालुकाध्यक्षपदी पंडितराव गावडे तर उपाध्यक्षपदी प्रभू बामणे



**धाकलगांव । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या आदेशानुसार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अंबड तालुका अध्यक्षपदी पंडितराव गावडे यांची तर उपाध्यक्ष पदी प्रभु बामणे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या नियुक्ती नंत अंबड तालुक्यातील शिवसेनेच्या उद्धव बा. ठाकरे कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. तसेच सर्वस्तरातून निवडीचे जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.

# टेंभुर्णीत गुरू शिष्य यांची जयंती उत्सवात

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील श्री संत सावता मंगल कार्यालया जवळ श्री सावता महाराज यांची मंदिर आणि दुसरीकडे भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असल्याने या ठिकाणी तरुणाची मोठी गर्दी आणि विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजता थोर समाज सुधारक क्रांतीसुर्य म हात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, गुरु शिष्य संयुक्त जयंती निमित्त संत सावता माळी चौक टेंभुर्णी येथे महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी टेंभुर्णीचे सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विष्णू जमधडे, टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सपोउप निरीक्षक रवी देशमाने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी भाजपचे शहराध्यक्ष राजु खोत,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गुड्डू मघाडे, व सर्व सन्माननीय सदस्य,माजी सरपंच लक्ष्मण शिंदे, पत्रकार व्यापारी महासंघाचे अलकेश सोमानी रावसाहेब अंभोरे, मनोज पंडीत, नगरसेवक फैसल चाऊस, रवि उखर्डे, पि.जि.तांबेकर, बि.टी.धनवई, संदीप मुळे, विनायक ढवळे, उपाध्यक्ष अमोल जमदाडे, सचिव स्वप्निल वाघमारे, कोषाध्यक्ष शंकर मुळे व बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# जवाहर नवोदय पात्रता परीक्षेत जिल्हा परिषद शाळा उसरघरचे दैदीप्यमान यश



**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी -** जानेवारी २०२५ रोजी केंद्र सरकार आयोजित जवाहर नवोदय पात्रता परीक्षा इयत्ता ६ वी करिता घेण्यात आली होती. या परीक्षेला संपूर्ण देशातून विद्यार्थी प्रविष्ट होत असतात. प्रत्येक जिल्हा स्तरावर एक नवोदय विद्यालयाची स्थापना केंद्र सरकारने केलेली आहे. सदरचे रायगड जिल्ह्या करिता नवोदय विद्यालय निजामपूर ता. माणगाव जिल्हा रायगड येथे आहे. सदर नवोदय विद्यालयात पात्र होण्या करिता इयत्ता पाचवी मध्ये पात्रता परीक्षेत मेरिटम ध्ये येणे आवश्यक असते. गुणांनुक्रमा नुसार प्रवेश दिला जात असल्याने संपूर्ण वर्षभर शिक्षक व विद्यार्थी मेहनत घेत असतात. त्यामध्ये संपूर्ण रायगड जिल्ह्यातून ८० विद्यार्थी निवडले जातात. या ८० विद्यार्थ्यां मध्ये निवड होण्याचा बहुमान रायगड जिल्हा परिषद शाळा उसरघरचा विद्यार्थी कु. सोहम बाबू यादव यांनी मिळवला आहे.

सोहम हा सर्वसामान्य कुटुंबातील मुलगा असून स्वतःच्या अभ्यासातील सातत्याने, सरावाने त्याने हे यश मिळवले आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी उचित मार्गदर्शनाने उत्तुंग असे यश मिळवू शकतो हे त्याने सिद्ध केले आहे. रायगड जिल्हा परिषद उसरघर शाळेचे मुख्याध्यापक, मार्गदर्शक श्री. अमित गांगण सर व सह शिक्षिका श्रीम. स्मिता गादगे मॅडम यांनी त्याला मोलाचे मार्गदर्शन केले. तर, त्याचे काका श्री.राजेंद्र यादव यांनी त्याला पाठबळ दिले. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती उसरघर, ग्रामस्थ मंडळ उसरघर यांनी सदर विद्यार्थ्याचे, त्यांच्या शिक्षकांचे व पालकांचे कौतुक केले.



# परतूर लॉयन्स डायलेसिस सेंटर साठी देणगीचा भरभरून प्रतिसाद

**परतूर । प्रतिनिधी -** लॉयन शकुंतलाताई व लायन प्रा म धुकर भोसले परतुर यांच्यातर्फे लॉयन्स डायलेसिस करिता एक लक्ष अकरा हजार रुपये देणगी जाहीर करण्यात आली.

लॉयन्स परिवार व दृष्टी फाउंडेशन सर्व संचालका तर्फे भोसले परिवाराचे आभार व अभिनंदन.परतुर येथे दृष्टी लायन्स नेत्रालय अंतर्गत चालू होत असलेल्या डायलिसिस सेंटर साठी दोन मशीन घेण्यात येणार आहेत. याकरिता लॉयन सुनीता नायबराव बोराडे यांच्यातर्फे एक लक्ष अकरा हजार व लॉयन संजीवनी मनोहर खालापुरे यांच्यातर्फे एक लक्ष अकरा हजार लॉयन सविता भगवान ठाकर यांच्यातर्फे एक लक्ष अकरा हजार रुपये श्रीमती विजया श्रीनिवासजी सोमाणी पुणे यांच्यातर्फे एक लक्ष रुपये लॉयन शोभा दिनकर टकले यांच्यातर्फे एक लक्ष अकरा हजार रुपये व . वेदिका इंटरप्राईजेस जालिंदर अवचार यांच्यातर्फे आरो सिस्टीम देणगी देण्यात येत आहे. यासाठी लागणारे दोन ऍडजेस्टेबल पलंग लॉयन शालिनी गुणवंत पिंपळे यांच्यातर्फे एक स्वतंत्र डायलिसिस मशीन स्वर्गीय ओंकारदासजी तोतला यांच्या स्मृती प्रियतर्थ लॉयन अर्चना तोतला लॉयन नितीनजी तोतला यांच्यातर्फे सहा लक्ष बहात्तर हजार रुपये आज देणगी देण्याचे जाहीर करण्यात आलेले आहे. एकूण दोन मशीन लॉयन्स डायलेसिस सेंटर परतुर येथे बसवण्यात येणार असून लवकरच डायलिसिस सेंटर कार्यान्वित होणार आहे. या सोबत कॅन्सर बाह्यरुग्ण तपासणी कक्ष देखील कार्यान्वित होणार आहे. भोसले परिवाराचा सन्म ान करण्यात आला.यावेळी प्रमोद टेकाळे मनोहर खालापूरे डॉक्टर भानुदास कदम बबनराव उन्मुखे डॉक्टर संदीप चव्हाण मुकुंद शेपाळ संतोष दीक्षित संतोष शिंदे संजीवनी खालापुरे व इतर उपस्थित होते.



हे प्रकल्प लायन्स क्लब परतुर व लायन्स क्लब जालना यांच्या संयुक्त उपक्रमातून होत आहेत. डायलोसिसच्या दोन्ही मशीन करिता डोनर मिळाल्यामुळे यानंतर सध्या तरी डायलिसिस मशीन करिता डोनेशन स्वीकारले जाणार नाही . सर्व डोनर चे दृष्टी फाउंडेशन संचालक व लायन्स क्लब सर्व सदनशांतर्फे आभार व अभिनंदन करण्यात येत आहे.

# तिसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना



**जालना । प्रतिनिधी -** फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने व राजस्थान फेंटबॉल असोसिएशन यांच्या वतीने दिनांक १८ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान जैतपुर, जयपूर राजस्थान या ठिकाणी संपन्न होणाऱ्या तिसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२४ - २५ करिता महाराष्ट्राचा संघ दिनांक १७ रोजी रवाना झाला आहे.

यावेळी महाराष्ट्र संघाला शुभेच्छा देण्यासाठी फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष खुशाल सिंह राणा ठाकूर यांची उपस्थीती होती, सोबतच संस्थापक सचिव शेख चांद पि.जे., स्पर्धा निरीक्षक शेख अहमद, उमेश चंद्र खंदारकर, मारुफ खान, सुरेश त्रिभुवन, पत्रकार शेख महेजबिन यांची उपस्थिती होती.

यावेळी खेळाडूंना शुभेच्छा देताना अध्यक्ष खुशालसिंह राणा ठाकूर यांनी प्रवासादरम्यान व स्परधे दरम्यान काळजी घेण्याचे आवाहन केले, तसेच स्पर्धेचा चषक सलग तिसऱ्या वर्षी ही महाराष्ट्रात घेवून यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

संघात दहा मुली वा चौदा मुलांचा सामावेश असून संघा सोबत चार तांत्रिक अधिकारी रवाना झाले आहेत. सदर राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून महाराष्ट्रासह बारा राज्य व जवळपास दोनशे चाळीस खेळाडू व अधिकारी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. संघ व्यवस्थापक म्हणून श्रीमती गीता संगम, सुरेश त्रिभुवन, शेख समीर, सोहेल खान हे काम पाहत असून संघासोबत ते ही रवाना झालेले आहेत.

# खानापूर जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना बक्षीसातून साहित्य वाटप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** खानापूर ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवारी ता.१७ कवायती मध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या बक्षीसातून विविध शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी केंद्रप्रमुख सुधाकर चिंधोटे होते तर यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वास शेळके, उपाध्यक्ष नंदू तायडे, सुभाष तायडे, ऋषिंद्र शेळके,कौतिक तायडे, एकनाथ काकडे ,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दमोता तायडे,गजानन तायडे,विठ्ठल तायडे, गजानन शेळके,अशोक शेळके, प्रदीप शेळके,बळीराम शेळके, मुख्याध्यापक विनोद कळंबे, श्रीमती शारदा कायंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रजासत्ताक दिनानिमित्त संपन्न झालेल्या कवायतीच्या कार्यक्रमास प्राप्त बक्षीसातून सहभागी विद्यार्थ्यांना एक पाणी बॉटल, एक टिफीन,टिफीन बॅग,पेन पॉकेट आणि अन्य विद्यार्थ्यांना २ रजिस्टर आणि टिफीन बॅग देण्यात आली. यावेळी बोलताना केंद्रप्रम ुख श्री चिंधोटे म्हणाले की मुख्याध्यापक आणि शिक्षक यांची तळमळ आणि त्याला ग्रामस्थांच्या दातृत्वाची साथ यामुळे खानापूर जिल्हा परिषद शाळा नावारूपाला आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विनोद कळंबे यांनी केले.



## पालक मेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** म ुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांनाही माहिती व्हावी. विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेबद्दल व्यक्त होण्याची पालकांना संधी मिळावी. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत पालकांच्या अपेक्षा शाळेच्या निदर्शनास याव्यात, यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे आज शनिवार १९ एप्रिल,२०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या मेळाव्यास विद्यार्थ्यांच्या आई आणि वडील दोघांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन शाळेच्या वतीने इयत्ता पहिलीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांनी केले आहे.

# जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव आयोजित उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव चौफुली या ठिकाणी दि१५ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४ या दरम्यान कबड्डीच्या तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिराचे वैशिष्ट्ये अशी : सदरील शिबिर हे निवासी असून फक्त मुलांसाठी असणार आहे,कबड्डीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण, आहार विषयक मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी बौद्धिक सत्राचे आयोजन,किडा मानसशास्त्र ज्ञानाचे आयोजन तसेच या शिबिराला राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षक व राष्ट्रीय पंच यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.या क्रीडा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल व टीव्ही पासून दूर राहण्याची सवय लागणार आहे शिबिराचे उद्धाटन जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किनगाव या शाळेचे संस्थापक अध्यक्ष तथा तालुकाप्रमुख युवा सेना बालासाहेब इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कैलास मुके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष विनोद जाधव , प्रतिष्ठित व्यापारी म हेश रायकर , शिवसेना शहरप्रमुख दत्ता शिराळे, उद्योजक अविनाश शिंदे आणि रोहिलागडचे सरपंच अड शामसुंदर पाटील हे होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.